# प्रेसनोट

दि.१४/०४/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | एम.आय.डी.सी. पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.३२५/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) ज्योती मच्छिंद्र डोके, पोलीस उप निरीक्षक (परिविक्षाधीन), वर्ग–२, वय–२६ वर्ष, नेमणूक एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर<br>२) संदीप रावसाहेब खेंगट, पोलीस हवालदार, बक्कल नं.७२०, वर्ग–३, नेमणूक एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ८,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ८,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की,यातील तक्रारदार यांचे मुलाविरुध्द एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे विनयभंग व पोस्को कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल असून सदर गुन्हयात त्याला न्यायालयीन कोठडी मंजूर झाली आहे. सदर गुन्हयात तक्रारदार यांच्या मुलाला जामीन लवकर मिळण्याकरीता मदत करु व न्यायालयाने म्हणणे मागितल्यावर लवकर देऊ असे सांगुन आरोपी लोकसेविका क्र.१ ज्योती मच्छिंद्र डोके, पोलीस उप निरीक्षक (परिविक्षाधीन) व आरोपी लोकसेवक क्र.२ संदीप रावसाहेब खेंगट, पोलीस हवालदार, बक्कल नं.७२० यांनी तक्रारदार यांच्याकडे दि.११/०४/२०२३ रोजी ८०००/– रुपये लाचेची मागणी करुन आरोपी लोकसेविका क्र.१ डोके यांनी सांगितले प्रमाणे आरोपी लोकसेवक क्र.२ खेंगट यांनी दि.१३/०४/२०२३ रोजी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडुन ८०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत एम.आय.डी.सी. पो.स्टे. गुरनं.३२५/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि.१४/०४/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००


(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर